दाखल तारीख – २६.०५.२०२५
नोंदणी तारीख – २६.०५.२०२५
निकाल तारीख – ०९.०६.२०२६
कालावधी – वर्षे : महिने : दिवस
०१ : ०० : १४

| |
|---|
| **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कुडाळ यांचे न्यायालयात**<br>**ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग** |
| (पिठासीन अधिकारी – जी.ए.कुलकर्णी)<br>(अधिघोषित दिनांक ०९.०६.२०२६)<br>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२०८/२०२५**<br>**निशाणी क्र.६ लगत** |
| प्रथम खबर अहवाल क्रमांक– ४४/२०२५<br>निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, कुडाळ |

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, कुडाळ |
| अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ | श्रीम.ए.डी.मिरजे |
| | **विरुध्द** |
| आरोपी | कमलेश विलास परब<br>वय–३० वर्षे, धंदा–शेती<br>रा.निवजे (कॅम्पवाडी) घर नं. २७१<br>ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | श्री.आर.डी.बिले |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २४.०२.२०२५ |
| गुन्हा दाखल दिनांक | २४.०२.२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | २६.०५.२०२५ |
| दोषारोप तयार केल्याचा दिनांक | २५.०९.२०२५ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | १०.११.२०२५ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | ---- |
| न्यायनिर्णय दिनांक | ०९.०६.२०२६ |
| दोषी ठरल्याचा दिनांक, जर असल्यास | निरंक |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर मुक्त केल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | आरोपीस सुनाविण्यात आलेली शिक्षा | बंदीवान म्हणून असलेला कालावधी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४६८ करिता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कमलेश विलास परब | बी.एन.एस.एस ३५(३) प्रमाणे नोटीस | २५/०९/२०२५ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई) प्रमाणे | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

**-:: न्यायनिर्णय ::-**

**(दिनांक ०९.०६.२०२६ रोजी घोषीत)**

साक्षीदारांचे जाब जबाब आणि प्रकरणाचा अभिलेख पहाता, सदर प्रकरणात खालील मुद्दे निघतात. सदर मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे का की, दिनांक २४.०२.२०२५ रोजी ११.४५ चे सुमारास गाव मौजे निवजे, कॅम्पवाडी ता.कुडाळ येथे के.पी.चिकन सेंटरच्या मागील बाजूस आरोपी एका | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | सावाच्या पोत्यामध्ये गोवा बनावटी दारूच्या कमांडर थ्री एक्स रम असे लेबल असलेल्या दारूने भरलेल्या १८० मिली मापाच्या एकुण ९६ सिलबंद प्लॅस्टीक बाटल्या अशी बेकायदेशीर दारु विक्री करणेच्या उद्देशाने विनापरवाना कब्जात बाळगलेल्या स्थितीत आढळून आला ? | |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**–:: कारणमिमांसा ::–**

२. याकामी अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचे दोषारोप शाबीत करणेकरिता खालीलप्रमाणे एक साक्षीदार तपासला.

**अ) अभियोगपक्षाचे साक्षीदार :–**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| १. | वैभव मल्हारी कोळेकर | फिर्यादी |

**ब) बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास :–**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :–**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाणीची यादी**

**अ) अभियोग पक्ष :–**

| **अनु.क्र.** | **निशाणी नंबर** | **निशाणी नंबरचे स्वरुप** |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र. पी–१ | फिर्याद |

**ब) बचाव पक्ष :-**

| अनु.क्र. | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क ) न्यायालयीन निशाणी :-**

| अनु.क्र. | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र.८ | रासायनिक पृथक्करण अहवाल |

**ड) मुद्देमाल तपशील :-**

| अनु.क्र. | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

३. आरोपीने त्याचे बचावासाठी स्वत:ची अगर कोणत्याही साक्षीदाराची साक्ष नोंदविलेली नाही अगर कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. आरोपीविरुध्द पुरावा समोर आल्याने आरोपीचा भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५१ (१) (ब) प्रमाणे जबाब नोंदविण्यात आलेला आहे.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्रमांक १ करिताः-**

५. अभियोगपक्ष साक्षीदार क्र.१ हे फिर्यादी असून त्यांनी त्यांचे सरतपासामध्ये दि.२४.०२.२०२५ रोजी ते निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, कुडाळ येथे जवान या पदावर कार्यरत होते. त्यादिवशी दुय्यम निरीक्षक यांना बातमी मिळाली की, गाव मौजे निवजे कॅम्पवाडी येथे के.पी.चिकन सेंटरच्या मागील बाजूस आरोपी गोवा बनावटी दारूची राजरोसपणे विक्री करतो. त्यानंतर दोन पंच नामे अशोक शिंदे व मुकुंद तारी यांना बोलावून शासकीय वाहनाने नमूद ठिकाणी गेले. आरोपी जवळील बॉक्सची पाहणी केली असता, गोवा बनावटीच्या कमांडर थ्री एक्स रमच्या

१८० मिली मापाच्या ९६ बाटल्या मिळून आल्या. मिळून आलेल्या मुद्देमालातून दोन १८० मिली मापाच्या बाटल्या घेवून त्यातून नमुना काढणेत आला. उर्वरित मुद्देमाल व नमुना बाटल्या घेवून जागीच पंचनामा करणेत आला सदर पंचनामा निरीक्षक श्री.गरूड यांनी केली. सदर घटनेची त्यांनी निशाणी पी–१ फिर्याद दिली' असे कथन केलेले आहे.

६. प्रस्तुत साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये असे कथन केले आहे की, घटनास्थळाशेजारी राहती घरे असून वर्दळीचे ठिकाण आहे. जप्त मुद्देमाल न्यायालयासमक्ष नाही. प्रस्तुत प्रकरणातील पंच हे त्यांचे नेहमीचे पंच आहेत. त्यांना स्थानिक पंच उपलब्ध होवू शकले असते. तपासणीकरिता पाठविलेली व कार्यालयाकडे असलेली नमुना बाटली न्यायालयासमक्ष नाही या बाबी मान्य केलेल्या आहे. प्रस्तुत साक्षीदाराच्या कथनांबाबत साशंकता निर्माण होईल अशी कोणतीही बाब अभियोगपक्षाने उलटतपासाद्वारे सादर केलेली नाही. फिर्यादी कथन करतात त्याप्रमाणे घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण असून तेथे त्यांना पंच साक्षीदार उपलब्ध होवू शकले असते, परंतु त्यांनी निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, कुडाळ येथे काम केलेले नेहमीचे पंच यांना तपासलेले आहे याबाबत अभियोगपक्षाच्या हकीकतीबाबत साशंकता निर्माण होत आहे.

७. प्रस्तुत साक्षीदाराने निशाणी पी–१ लगत दाखल असणाऱ्या फिर्याद जबाबास पुरक होईल अशा स्वरुपाची कथने न्यायालयासमक्ष केलेली असली तरीदेखील या कथनास दुजोरा देवू शकेल असा कोणताही साक्षीदार अभियोग पक्षाच्या वतीने तपासणेत आलेला नाही. अभियोगपक्षाने सदर गुन्हयाचे कामी तथाकथित जप्त केलेला कोणताही मुद्देमाल न्यायालयासमक्ष दाखल केलेला नाही. यावरुन सदर साक्षीदाराची कथने ही विश्वसनीय वाटत नाहीत. सबब, प्रस्तुत साक्षीदाराच्या सदर कथनांबाबत साशंकता निर्माण होत आहे.

८. प्रस्तुतकामी अभियोगपक्षाने घटनास्थळावरील पंच साक्षीदार व तपासी अधिकारी यांना

देखील तपासलेले नाही. याचाच अर्थ अभियोगपक्षाने जप्ती पंचनामा सिध्द केलेला नाही. तसेच सदर गुन्हयाचे कामी तपासकामी कशाप्रकारे करणेत आलेले आहेत हे देखील न्यायालयासमोर स्पष्ट केलेले नाही. अभियोग पक्षास वेळोवेळी संधी देवून देखील अन्य कोणत्याही साक्षीदाराची उपस्थिती संरक्षित करणेस अभियोगपक्ष अपयशी ठरलेला आहे. अभियोग पक्षाने त्यांची कथने सिध्द करणेकरिता दारुचा कोणताही मुद्देमाल न्यायालयासमक्ष सादर केलेला नाही. अशा परिस्थितीमध्ये केवळ फिर्यादी यांच्या कथनांवर विसंबून राहून आरोपीने बेकायदेशीररित्या दारुची विक्री करणेकरीता दारु कब्जेत बाळगली हे सिध्द झाले, असे म्हणता येणार नाही.

९. प्रस्तुतकामी निशाणी क्र.८ रासायनिक पृथक्करण अहवाल सादर करणेत आलेला असून, त्याचे अवलोकन केले असता, रासायनिक पृथक्करण केलेल्या द्रव्यामध्ये अनुक्रमे २८.२६% v/v इतके इथाईल अल्कोहल असलेचे स्पष्ट होते. तथापि, अभियोग पक्षाने रासायनिक पृथक्करणाकरिता पाठविणेत आलेले द्रव्य हे आरोपीचे ताब्यातून जप्त करणेत आलेले होते ही बाब निःसंशयपणे सिध्द करणेस अभियोगपक्ष अपयशी ठरलेला आहे. मुलतः अभियोग पक्षाने जप्ती पंचनामा निःसंशयपणे सिध्द केलेला नसलेमुळे या कामी दाखल झालेला रासायनिक पृथक्करण अहवाल आरोपीचे दोषत्व सिध्द करणेस पुरेसा व माफक पुरावा होणार नाही.

एकंदरीत अभिलेखावरील सर्व पुरावा विचारात घेता, अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द ठेवलेले आरोप हे निःसंशयपणे सिध्द केलेले दिसून येत नाही. सबब मी मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ करीताः</u>–**

१०. मुद्दा क्रमांक २ करिता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी कमलेश विलास परब वय–३० वर्षे, रा.निवजे (कॅम्पवाडी) घर नं.२७१ यांची भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७८(१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) खाली शिक्षापात्र असलेल्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

३. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम ४८१ च्या पुर्ततेसाठी रक्कम रु.१५,०००/– रुपयांचे बंधपत्र व जामीनदारांचे जामीनखत सात दिवसांचे आत सादर करावे.

४. निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, कुडाळ यांना याद्वारे निर्देशित करण्यात येते की, याकामी जप्त असलेला मुद्देमाल म्हणजेच एका सावाच्या पोत्यामध्ये गोवा बनावटीच्या कमांडर थ्री एक्स रम असे इंग्रजी लेबल असलेल्या मद्याने भरलेल्या १८० मिली मापाच्या ९६ सिलबंद प्लॅस्टीक बाटल्या या मुद्देमालाची अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

सही/–

दिनांक–०९.०६.२०२६.

[ जी. ए. कुलकर्णी ]
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कुडाळ.